# ANTI DOWRY MOVEMENT, BOMBAY.
# हुंडा विरोधी चळवळ, मुंबई

4/50 Vishnu Prasad 'B' Society, Shahajiraje Marg, Freedon Fighter Mamasheb Kulkarni Chowk,
Vile Parle (E) Mumbai 400 057. Tele.No.022-26836834 / 26836132.

---

*मामासाहेबांनी युवा पिढीच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतला होता. युवा पिढी म्हणजे देशाचे भविष्य! युवकांना अंधश्रद्धेपासून परावृत्त करण्यासाठी, त्यांच्या विचारांची दिशा विज्ञाननिष्ठीत व्हावी, आधुनिक युगात बलसागर भारत घडवण्याचे स्वप्न त्यांनी पहिले, यासाठी तरुणांनी सक्षम व्हावे म्हणून मामांनी आयुष्य वेचले. वयाच्या ९८ व्या वर्षापर्यंत विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयातून ते जाणीव जागृतीसाठी, युवकांशी संवाद साधण्यासाठी, व्याख्यानांसाठी जात होते. मृत्यूपूर्वी जवळ जवळ ३० ते ३५ वर्षाच्या दीर्घकाळात त्यांनी ५ हजारांहून अधिक युवा सक्षमीकरणाचे कार्यक्रम यशस्वी केले. या कार्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला, महाराष्ट्र तर अक्षरशः पिंजून काढला. मामा सानेगुरुजींचे विद्यार्थी / अनुयायी. गुरुजींचा प्रदीर्घ सहवास त्यांना लाभलेला आणि म्हणून हे सर्व शक्य झाले ते केवळ सानेगुरुजींच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने अशी मामासाहेबांची धारणा होती.*

*३ ऑक्टोबर २०११ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. त्यानंतरचे वर्ष मामांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. त्यानिमित्ताने वर्ष २०१२-१३ पासून मामासाहेबांच्या स्मरणार्थ व सानेगुरुजींच्या नावाने आम्ही सानेगुरुजी युवा पुरस्कार दर वर्षी युवा दिनाचे निमित्ताने दोन युवकांना देतो. या पुरस्काराचे स्वरूप असते : मानधन रु.१०,०००/-, सन्मानपत्र, चांदीचे सन्मानचिन्ह, ग्रंथभेट, आणि खादीच्या सुताचा हार ( मामानी आजीवन खादी वापरली ते खरंच एकादश व्रताचे पालन करणारे गांधीवादी होते) या पुरस्काराचा संपूर्ण खर्च कुलकर्णी कुटुंबीयांतर्फे विशेषतः मामानी कुटुंबियांसाठी मागे ठेवलेल्या पुंजीतून केला जातो. मामा नेहमी म्हणत आपल्या स्वताःच्या मिळकतीतून कुटुंबाच्या चरितार्थासाठी लागणारा निधी वगळता उरलेला पैसा समाजाचा असतो आपण त्याचे केवळ विश्वस्त असतो.*

*गेल्या सहा वर्षात चौदा असे पुरस्कार दिले गेले आहेत. त्यातील काही जणांच्या नावाचा उल्लेख करणे संयुक्तिक होईल.*

*वर्ष १ ले (१) स्विटी प्रकाश पाटे - चाळीसगाव जिल्हा जळगाव - एरोस्पेस इंजिनीअर नासामद्धे एका वर्षात दोन प्रोजेक्ट्स सादर करणारी पहिली युवा वैज्ञानिक*

*(२) धीरज राजेंद्र जाधव - पुणे - इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर - नासाच्या मंगळ यानातील संदेश यंत्रणेसाठी मोलाचे संशोधन.*



*(३) अलंकार शशिकांत कोतवाल - ठाणे - जागतिक स्तरावर सायन्स ऑलिम्पियाड मद्धे सुवर्ण पदक मिळवून भारतीय चमूला यश देणारा युवा वैज्ञानिक*

*(४) जयश्री जणू खरपडे - वाडा, जिल्हा ठाणे - प्रतिकूल परिस्थितीत संघर्षमय जीवनात स्वतःचे मनोधैर्य वाढवून इतरांना प्रेरणा देणारी आदिवासी युवती*

*वर्ष २ रे (५) सजल सुरेश कुलकर्णी - नागपूर - बायोटेकनॉलॉजिस्ट युवा वैज्ञानिक*

*(६) डॉ. प्रियदर्श तुरे : मेळघाट, अमरावती - जीवाची पर्वा न करता दुर्गम भागात वैद्यकीय सेवा पुरवणारा एक युवा डॉक्टर*

*वर्ष ३ रे (७) अजिंक्य हेमंत पाटील - नाशिक - रेडिओ ॲस्ट्रॉनॉमि विषयात संशोधनासाठी नेदरलँड्स येथे १२ कोटी ची शिष्यवृत्ती मिळवणारा एकमेव भारतीय युवा*

*(८) अभिषेक निर्मल हुंबड - बंगलोर - जागतिक स्तरावर तीस वर्षाखालील तीस प्रतिभावान व्यक्तींमधे एक स्थान मिळविणारा एकमेव भारतीय युवा अभियन्ता.*

*वर्ष ४ थे (९) सचिन बंडोपंत तळेकर - राधानगरी, कोल्हापूर - प्रदूषणावर मात करण्यासाठी जैव तंत्रज्ञानात उल्लेखनीय संशोधन करणारा युवा वैज्ञानिक*

*(१०) सायली मकरंद चुरी - माहीम, मुंबई - विदेशी भाजा व फळे लागवडीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारी कृषितद्न्य युवती*

*वर्ष ५ वे (११) विराज विनायक रानडे : नाशिक - पर्यावरण रक्षणार्थ लोकोपयोगी संशोधन करणारा युवा वैज्ञानिक*

*(१२) जान्हवी विलास लोकेगावकर : चेंबूर मुंबई - राष्ट्रीय सेवा योजना गटाचे, दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी राजपथावर संचालनाचे नेतृत्व करणारी युवती*

*वर्ष ६ वे (१३) रुपाली रवींद्र माली - सोनगीर, धुळे. एका सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातील रुपाली माळीने युवक कल्याण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल युवा पुरस्काराचा मान.*

*(१४) प्रथमेश सोमा हिरवे - पवई, मुंबई. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या प्रथमेशने भारतीय अंतरिक्ष संशोधन अनुसंधान मधील संशोधनासाठी स्वतःची गुणात्मक योग्यता अधोरेखित करत सोळा हजार अभियंता उमेद्वारांतून पाचव्या क्रमांकाची निवड मिळविली.*

*********************************************